गुरुवार दि. ०४ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेरदहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पत्रकार एकजुटीमुळे तब्बल अठरा तासानंतर गुन्हा दाखल

## गुटखा प्रकरणांच्या वृत्तांकनाचा राग? दोन अज्ञातांकडून पत्रकारावर हल्ला

## हे कसले फॅड; पत्रकार संरक्षण कायद्यावर डिवायएसपींचा अनोखा शोध; लाला नावाची दहशत आहे का?



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील पत्रकारितेच्या क्षेत्राला हादरवून सोडणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. दैनिक जगाचा जगमित्रचे संपादक तथा पत्रकार संतोष विष्णु भुतेकर यांना घरासमोर अडवून दोन अज्ञात इसमांनी बंदुकीचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पत्रकार संरक्षण कायद्यासह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमे लावण्यात आली आहेत. महत्त्वाचे म्हणजे काल रात्री अकरा सुमारास घडलेल्या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.३० नंतर गुन्हा दाखल होतो म्हणजेच तब्बल अठरा तासांनंतर गुन्हा दाखल करण्यात आला हा गुन्हा केवळ पत्रकार एकजुटीमुळे शक्य असल्याची प्रतिक्रीया उपस्थित पत्रकारांमधून येत आहे. पोलीसांकडून प्राप्त माहितीनुसार, २ जून रोजी रात्री सुमारे ११ वाजेच्या सुमारास संतोष भुतेकर हे आपल्या निवासस्थानाजवळील कार्यालयातील काम आटोपून पाळीव कुत्र्याला फिरवण्यासाठी घराबाहेर गेले होते. मयुरी रेसिडेन्सी परिसरातील घरासमोरील रस्त्याच्या कोपऱ्यावर उभे असताना त्यांच्या पाठीमागून दोन अज्ञात इसम आले. फिर्यादीनुसार, दोघांनी भुतेकर यांची कॉलर पकडून त्यांना धमकावण्यास सुरुवात केली. तू पत्रकार आहेस, जास्त शहाणा होऊ नकोस. तू सतत गुटखा प्रकरणांच्या बातम्या प्रसिद्ध करतोस, त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, असे म्हणत एका आरोपीने त्यांच्या पाठीला बंदुकीसारखी वस्तू लावली आणि याच बंदुकीने तुला उडवून टाकू, अशी धमकी दिली. यावेळी भुतेकर यांच्या हातातील पाळीव कुत्रा आरोपींच्या दिशेने धावून गेल्याने आरोपी घाबरले. त्यानंतर एका आरोपीने बंदुकीच्या मागील भागाने भुतेकर यांच्या डाव्या हातावर प्रहार केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. तुला बघून घेतो, अशी धमकी देत दोघे घटनास्थळावरून पसार झाले. घटनेनंतर भुतेकर यांनी तातडीने चंदनझिरा पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. उपचारानंतर त्यांनी दुसऱ्या दिवशी अधिकृत तक्रार दाखल केली. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७०/२०२६ दाखल करण्यात आला आहे. अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२) (मारहाण), ३५१(२) (गुन्हेगारी धमकी), ३(५) (सामूहिक कृत्य) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ व २५ आणि महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती व प्रसार माध्यम संस्था (हिंसा व मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक) अधिनियम २०१७ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.या गंभीर प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस (पान २ वर)

**पत्रकार संरक्षण कायद्यासह गंभीर कलमांखाली गुन्हा**

### "पत्रकारांबाबत चंदनझीरा पोलिसांचे दुटप्पी धोरण अस्वीकार्य" - दीपक शेळके

पत्रकारांवर हल्ले, जीवे मारण्याच्या धमक्या आणि दबावाचे प्रकार वाढत असताना कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेकडून सर्वांना समान न्याय मिळणे अपेक्षित असल्याची प्रतिक्रिया पीसीएमचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी व्यक्त केली. मात्र, पत्रकाराविरुद्ध तक्रार आली की तत्परतेने गुन्हा दाखल करायचा आणि पत्रकार स्वतः हल्ल्याचा बळी ठरला असताना त्याची तक्रार प्रलंबित ठेवायची, ही भूमिका अत्यंत चिंताजनक व निषेधार्ह आहे. पत्रकार संतोष भुतेकर यांना बंदुकीचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप असताना पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल न करणे अनेक प्रश्न निर्माण करणारे आहे. कायद्याचे निकष व्यक्ती, पद किंवा प्रकरणानुसार बदलू नयेत. पोलिस प्रशासनाने एकाच मापदंडाने सर्व प्रकरणांकडे पाहणे आवश्यक आहे. पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. अवैध धंदे, भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार उघड करणाऱ्या पत्रकारांना संरक्षण देण्याऐवजी त्यांच्याच तक्रारींकडे दुर्लक्ष होत असेल, तर तो अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अप्रत्यक्ष आघात मानला जाईल.

या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून निष्पक्ष चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि पत्रकारांच्या सुरक्षेबाबत ठोस भूमिका जाहीर करावी. तब्बल अठरा तासांपेक्षा अधिकचा वेळ गुन्हा दाखल करण्यास लागतो हे न समजण्यासारखे मुळीच नाही. येत्या काळात पोलीसांनी तातडीने गुन्ह्याचा तपास करून लवकरात लवकर आरोपींना ताब्यात घ्यावी अन्यथा पोलिसांच्या दुटप्पी धोरणाविरोधात लक्षवेधी आंदोलन करण्याचा ईशारा दीपक शेळके यांनी माध्यमांशी बोलतांना दिला आहे. ''पत्रकारांवर अन्याय आणि गुन्हेगारांवर मेहरबानी हे लोकशाहीला घातक आहे; कायद्याचा न्याय सर्वांसाठी समान असलाच पाहिजे. असेही श्री शेळके यांनी शेवटी म्हटले आहे.

# जनसामान्यांचा आवाज बुलंद करणारे नेतृत्व म्हणजे स्व.मुंडे साहेब-जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

## *स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना भाजपाच्या वतीने अभिवादन*

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना महानगर भाजपाच्या वतीने स्व. गोपीनाथराव मुंडे चौक येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, जिल्हा उपाध्यक्ष धनराज



काबलिये, सिद्धिविनायक मुळे, नारायण पवार, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष, सुनील खरे, संजय डोंगरे, नगरसेवक अर्जुन गेही, शशिकांत घुगे, विष्णू डोंगरे, राजेश जोशी, अनिरुद्ध पांजगे, नगरसेवक कल्याण भदनेकर, जिवन सले, अजित मानधनी, गौरव गोधेकर आदींची उपस्थिती होती.

जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी सामान्य कार्यकर्त्याला पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. (पान २ वर)

# जालना येथे शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांची सुहास शिरसाट यांनी घेतली सदिच्छा भेट

## विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण चर्चा

**जालना - प्रतिनिधी**

जालना महाराष्ट्र विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर-जालना विधान परिषद मतदारसंघाचे उमेदवार सुहास शिरसाट यांनी जालना येथील दर्शना बंगला, भाग्यनगर येथे जालना आमदार तथा शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. भेटीदरम्यान आगामी विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने विविध राजकीय, सामाजिक तसेच संघटनात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, कार्यकर्त्यांशी समन्वय वाढविणे तसेच मतदारसंघातील विविध प्रश्नांवर संवाद साधण्यात आला. याप्रसंगी आमदार नारायण कुचे, शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, सुधाकर वाढेकर, कडुबा इंदलकर, संदीप घारे, नंदू दाभाडे, गुलाब पाटील, निलेश गोर्डे पाटील, राम बनसोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आगामी निवडणुकीत पक्षाची भूमिका, संघटनात्मक बांधणी आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागाबाबत सकारात्मक चर्चा झाली. तसेच मतदारसंघातील विकासकामे आणि जनतेच्या अपेक्षांबाबतही विचारविनिमय करण्यात आला.

या प्रसंगी स्थानिक पदाधिकारी, शिवसैनिक, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदिच्छा भेटीमुळे आगामी विधान परिषद निवडणुकीच्या दृष्टीने शिवसेना संघटनेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.



# जाफ्राबादमध्ये महागाईविरोधात काँग्रेसचा बैलगाडीसह मोर्चा

## कल्याण दळे यांच्या नेतृत्वाखाली शासनाच्या धोरणांचा निषेध; तहसील कार्यालयावर धडक देत दिले निवेदन

**दत्ता देशमुख**

केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यासाठी जाफ्राबाद येथे काँग्रेसच्या वतीने बैलगाडीसह भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि जीवनावश्यक वस्तूंच्या गगनाला भिडलेल्या किमतींविरोधात आंदोलकांनी सरकारचा तीव्र निषेध नोंदवला. हा मोर्चा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, ज्येष्ठ नेते सुरेश पाटील वाकडे, नेते सुरेश गवळी, माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे आणि तालुकाध्यक्ष अजय बनकर यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला. मोर्चामध्ये पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

करत बैलगाडीसह निघालेल्या या मोर्चाने शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत तहसील कार्यालयावर धडक दिली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. महागाईमुळे सर्वसामान्यांचे जीवन कठीण झाले असून इंधन, गॅस, डाळी आणि तेलाच्या किमती आवाक्याबाहेर गेल्या आहेत. सरकारने तातडीने उपाययोजना करून महागाईवर नियंत्रण आणावे, अशी मागणी काँग्रेस नेत्यांनी केली. महागाई रोखण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, या मागणीचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले.




# परतूर शहरात व्यापाऱ्यांवर वाढते भ्याड हल्ले व चोऱ्यांचे सत्र सुरूच

## व्यापारी महासंघाचा संताप, उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना दिले तीव्र निषेधाचे निवेदन

**परतूर - प्रतिनिधी**

शहरात कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले असून व्यापाऱ्यांवर होणारे जीवघेणे हल्ले आणि वाढत्या चोऱ्यांच्या घटनांमुळे व्यापारी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. काल रेल्वे स्टेशन परिसरात भर बाजारपेठेत प्रतिष्ठित व्यापारी तथा होलानी ट्रेडर्सचे मालक पंकज होलानी व प्रवीण (बाळू) होलानी यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज व्यापारी महासंघ, परतूर च्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी आर.टी. रेंगे, उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड व पोलिस निरीक्षक सुदाम भागवत यांना तात्काळ कारवाई करण्याबाबत जाहीर निवेदन देण्यात आले. तसेच दुकानें बंद ठेऊन या निवेदनाद्वारे व्यापाऱ्यांनी शहरातील खालावलेल्या सुरक्षा व्यवस्थेबद्दल अत्यंत चिंता व्यक्त केली आहे.




निवेदनात नमूद केल्यानुसार, दि. ०२ जून रोजी रात्री ७:३० वाजता रेल्वे स्टेशन परिसरात पंकज होलानी व प्रवीण होलानी यांना अडवून अत्यंत क्रूरपणे मारहाण करण्यात आली. या भ्याड हल्ल्यात पंकज होलानी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, हल्लेखोरांनी त्यांच्याकडील पैशांनी भरलेली बॅग चोरण्याचा देखील प्रयत्न केला. सुदैवाने हा प्रयत्न फसला असला तरी या घटनेने व्यापारी सुरक्षेचा (पान २ वर)

## संपादकीय...

# स्वच्छतेच्या घोषणा आणि वास्तवातील घाणीचे साम्राज्य

जालना शहरातील वार्ड क्रमांक ७ मधील मामा चौक ते बाबा टी हाऊस परिसराची सध्याची अवस्था ही केवळ एका भागाची समस्या नसून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर आणि प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात कचऱ्याचे ढीग, तुंबलेली गटारे, रस्त्यावर वाहणारे सांडपाणी आणि सर्वत्र पसरलेली दुर्गंधी दिसत असेल, तर ''स्वच्छ शहर''च्या घोषणा कितपत प्रभावी आहेत, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

स्वच्छता हा केवळ सौंदर्याचा विषय नाही; तो थेट सार्वजनिक आरोग्याशी निगडित आहे. एखाद्या परिसरात घाण साचणे, गटारे तुंबणे आणि सांडपाणी रस्त्यावर येणे म्हणजे रोगराईला निमंत्रण देण्यासारखे आहे. विशेषतः पावसाळ्याच्या तोंडावर अशी परिस्थिती अधिक धोकादायक ठरते. डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, टायफॉईड यांसारख्या साथीच्या रोगांना पोषक वातावरण निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही समस्या कायम असल्याचा आरोप केला जात आहे. जर हे खरे असेल, तर प्रशासनाच्या प्रतिसाद यंत्रणेचे अपयश मानावे लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्राथमिक कर्तव्य म्हणजे नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे. जेव्हा नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी वारंवार आवाज उठवावा लागतो, तेव्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. या प्रकरणातील दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे लोकप्रतिनिधींची भूमिका. निवडणुकांच्या काळात विकासाची आश्वासने देणारे आणि जनतेच्या दारात जाणारे प्रतिनिधी निवडून आल्यानंतर नागरिकांच्या दैनंदिन समस्यांकडे कितपत लक्ष देतात, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जनतेशी सातत्याने संपर्क ठेवणे आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित असते. याचा परिणाम केवळ नागरिकांवरच होत नाही, तर स्थानिक व्यापारावरही होतो. अस्वच्छ वातावरणामुळे ग्राहक कमी होतात, व्यापाऱ्यांचे नुकसान होते आणि परिसराची प्रतिमा मलिन होते. शहराच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर याचा दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.

तथापि, या समस्येचा विचार करताना नागरिकांची जबाबदारीही दुर्लक्षित करता येणार नाही. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, स्वच्छतेच्या नियमांचे पालन न करणे आणि सामूहिक जबाबदारीपासून दूर राहणे या बाबीही काही प्रमाणात परिस्थिती बिघडवतात. त्यामुळे प्रशासन आणि नागरिक या दोघांनीही एकत्रितपणे स्वच्छतेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आज गरज आहे ती तात्पुरत्या उपाययोजनांची नव्हे, तर कायमस्वरूपी व्यवस्थेची. नियमित स्वच्छता, गटारांची वेळोवेळी साफसफाई, कचरा व्यवस्थापनाची प्रभावी यंत्रणा, डास नियंत्रणासाठी विशेष मोहीम आणि नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही ही बाबी प्राधान्याने राबविणे आवश्यक आहे. वार्ड क्रमांक ७ मधील परिस्थिती प्रशासनासाठी एक इशारा आहे. नागरिकांच्या संयमाचा अंत होण्यापूर्वी आणि आंदोलनाची वेळ येण्यापूर्वी संबंधित यंत्रणांनी जागे होणे गरजेचे आहे. स्वच्छतेच्या घोषणा फलकांवर नव्हे, तर रस्त्यांवर आणि परिसरात दिसल्या पाहिजेत. कारण स्वच्छ शहराची खरी ओळख घोषणांनी नव्हे, तर नागरिकांच्या दैनंदिन अनुभवातून निर्माण होत असते.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात जाफ्राबादमध्ये आक्रोश; तहसीलदारांमार्फत शासनाला निषेध निवेदन



**दत्ता देशमुख**

दि. २ जून रोजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याच्या प्रस्तावित निर्णयाविरोधात जाफ्राबादमध्ये समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या निर्णयाचा निषेध नोंदवत तहसीलदार जाफ्राबाद यांच्यामार्फत शासनाला निवेदन सादर करण्यात आले. आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द करावा, अन्यथा लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संविधानाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समाजाला दिलेले

आरक्षण हे हजारो वर्षांच्या सामाजिक अन्याय, अस्पृश्यता, भेदभाव आणि शोषणाविरुद्धचे संविधानिक संरक्षण आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर उभारलेली ही आरक्षण व्यवस्था वंचित आणि मागास समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अशा परिस्थितीत आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न हा संविधानाच्या मूलभूत तत्त्वांनाच आव्हान देणारा असून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

यावेळी उपस्थितांनी शासनाच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समाजाच्या आरक्षणावर कोणत्याही प्रकारचा आघात सहन केला जाणार नाही. सामाजिक न्यायाच्या नावाखाली समाजामध्ये विभागणी निर्माण करणारे निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावेत, अशी ठाम भूमिका मांडली. आंदोलनकर्त्यांनी सादर केलेल्या निवेदनामध्ये काही प्रमुख मागण्या मांडल्या. त्यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षणामध्ये कोणतेही उपवर्गीकरण करण्यात येऊ नये, संविधानाने दिलेले मूळ आरक्षण अबाधित ठेवावे, समाजात तेढ व विभाजन निर्माण करणारे निर्णय त्वरित मागे घ्यावेत, सामाजिक न्याय व संविधानिक हक्कांचे संरक्षण करावे तसेच शासनाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समाजाच्या भावना लक्षात घेऊन आपली स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशा मागण्यांचा समावेश होता. यावेळी उपस्थित आंबेडकरी सम ाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शासनाला इशारा देत सांगितले की, या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन उपवर्गीकरणाचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी व्यापक जनसंघर्ष उभारला जाईल. जाफ्राबाद शहरासह परिसरातील विविध आंबेडकरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान संविधान संरक्षण, सामाजिक न्याय आणि आरक्षण बचावाच्या घोषणा देत शासनाच्या निर्णयाचा निषेध करण्यात आला.

# जाफ्राबाद-चिखली रोड कार जळीत प्रकरण : मुख्य आरोपी सुरतमधून अटकेत

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद-चिखली रोडवरील गाजलेल्या कार जळीत प्रकरणात जाफ्राबाद पोलिसांना मोठे यश मिळाले असून मुख्य फरार आरोपी नितीन गवळी आणि त्याची प्रेयसी अनिता पंडित यांना गुजरातम धील सुरत येथून अटक करण्यात आली आहे. या अटकेमुळे प्रकरणातील अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जालना जिल्हा पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर आणि पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या म ार्गदर्शनाखाली विशेष पथकाने ही कारवाई केली. पोलिस उपनिरीक्षक वाल्मीक नेमाने, जमादार राजेंद्र सानप, पोलीस कॉन्स्टेबल विजय जाधव आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल स्वाती पंडित यांच्या पथकाने तांत्रिक माहिती व गोपनीय सूत्रांच्या आधारे सुरतमध्ये शोधमोहीम राबवली. अखेर एका ठिकाणी पाण्याच्या टाकीखाली लपून बसलेल्या दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस पथकाने सुमारे १५ ते १६ तासांचा प्रवास करून गुजरात गाठली. सातत्यपूर्ण पाठपुरावा, तांत्रिक तपास आणि अचूक माहितीच्या आधारे ही मोहीम यशस्वी ठरली. तपासादरम्यान या प्रकरणात एकूण चार आरोपींचा सहभाग समोर आला आहे. तसेच विजय चौहान यांना रंगकामाच्या बहाण्याने बोलावून कटाचा बळी बनविण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. आर्थिक लाभ मिळवण्यासाठी आणि स्वतःचा मृत्यू झाल्याचा बनाव करण्यासाठी हा कट रचण्यात आल्याची शक्यता पोलिस तपासत आहेत. यापूर्वी दोन आरोपींना अटक करण्यात आली होती. आता मुख्य आरोपीही पोलिसांच्या ताब्यात आल्याने कटाची संपूर्ण माहिती, इतर संभाव्य सहभागी आणि पुरावे नष्ट करण्याच्या हालचालींबाबत महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची अपेक्षा आहे.

सुरुवातीला अपघात वाटणाऱ्या या घटनेम ागे पूर्वनियोजित कट असल्याचे तपासातून समोर आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. सध्या जाफ्राबाद पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून आरोपींची सखोल चौकशी केली जात आहे.

## पान १ व ४ वरुन....

### गुटखा प्रकरणांच्या...

अधिकारी अनंत महिपतराव कुलकर्णी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. पत्रकाराला लक्ष्य करून धमकी देण्यात आल्याने पत्रकार संघटना, सामाजिक संघटना आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पत्रकारांवर हल्ले करून सत्य दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कायद्याचा कठोर धडा शिकवावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. शहरातील पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या या घटनेमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

**हे कसले फॅड; पत्रकार संरक्षण कायद्यावर डिवायएसपींचा अनोखा शोध**

चंदनझिरा पोलीस ठाण्यात बुधवार (दि ३) रोजी संतोष भुतेकर तक्रार देण्याच्या अनुषंगाने पोहचले असता, तक्रार दाखल करुन घेण्यास पोलीस ठाण्यातील पोलीसांनी विलंब केला. दरम्यान, पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करता येणार नसल्याचा पावित्रा पोलीसांनी घेतला. त्यावर उपस्थित एका पत्रकाराने डिवायएसपी अनंत कुलकर्णी यांना फोन केला. त्यावर त्यांनी चक्क हे कसले फॅड पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करा असे म्हणत संबंधीत संतोष भुतेकर यांस मारहाण झालीच नसल्याचा अनोखा शोध लावला. डिवायएसपींच्या अशा अजब वक्तव्यांमुळे पत्रकारांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला. पोलीस उपविभागीय अधिकारी दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य करणे शोभनीय आहे का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो आहे.

**पत्रकार एकजुटीमुळे गुन्हा दाखल**

या प्रकरणात पोलीसांकडून ऐन केन प्रकारे गुन्हा दाखल करण्यात टाळाटाळ करण्यात येत होती. सर्वप्रथम तर कॉम्प्युटर खराब आहे उदया गुन्हा दाखल करुन असे पोलीसांकडून म्हंटल्या गेले. त्यानंतर पत्रकार संरक्षण कायद्या लागू करत नाही, नंतर बंदुकीचा उल्लेख टाळावा. अशा एक ना अनेक कारणांनी तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. मात्र, पत्रकारांच्या एकजुटीपुढे पोलीस प्रशासनाने शेवटी गुन्हा दाखल केला. तब्बल अठरा तासांपेक्षा अधिक काळ पोलीसांनी चालढकल केली हे विशेष.

**लाला नावाची दहशत आहे का?**

पोलीसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करुन घेण्यास विलंब केला असल्याने पोलीसांमध्ये देखील लाला या नावाची दहशत आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे. दुसरीकडे अवैध धंद्यांवाल्यांकडून पोलीस प्रशासन हफ्ते घेतो हा नेहेमीचाच आरोप पोलीसांवर आहे. जालना पोलीस अधिक्षक पदी नुकतेच रुजू झालेले तेघबीर सिंग संधू यांनी अवैध धंद्यावर अंकुश कसला असला तरी गुटखा विक्री-वाहतूक काही थांबलेली दिसून येत नाही. त्यामुळे पोलीस अधिक्षकांना आता त्याच्या पोलीस ठाण्यातंर्गत नेमके काय शिजतयं याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. अधिक्षक म्हणून त्यांच्याकडे शिस्त आणि भूमिका आहे. मात्र ती प्रत्यक्षात आणण्यासाठी पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक व इतर पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त आणि अवैध धंद्यावाल्यांविरोधात ठोस भूमिका घेण्यासाठी पोलीस अधिक्षकांनी लक्ष घालावे.

### जनसामान्यांचा आवाज...

ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याची त्यांची तळमळ आणि जनसामान्यांशी असलेली नाळ ही आजही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार आणि कार्यपद्धती आत्मसात करून समाजसेवा करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा. मुंडे साहेबांनी राज्यातील आणि देशातील राजकारणात सामान्य माणसाचा आवाज बुलंद केला. त्यांच्या संघर्षमय जीवनातून कार्यकर्त्यांनी संघटन बांधणी, जनसंपर्क आणि समाजकारणाचे धडे घ्यावेत असे हि त्यांनी सांगितले.

### परतूर शहरात...

प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. यापूर्वीही गोकुळ स्वीट मार्ट येथे एका ग्राहकाने माल घेऊन पैसे देण्यास नकार देत व्यापाऱ्यावर थेट जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर घटना घडली होती, अशी आठवणही महासंघाने करून दिली आहे.

व्यापारी हा शहराच्या आर्थिक विकासाचा मुख्य कणा आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून परतूर शहरात व्यापाऱ्यांना सातत्याने टार्गेट केले जात असल्याने संपूर्ण व्यापारी वर्गात भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करण्याची प्राथमिक जबाबदारी प्रशासनाची व पोलिसांची आहे, परंतु स्थानिक पोलीस प्रशासन यामध्ये पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे.

### अहिल्यादेवी होळकर...

प्रमुख उद्दिष्ट होते. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आपल्याला सेवा, त्याग, न्याय, प्रामाणिकपणा आणि लोककल्याणाची प्रेरणा देते. त्यांनी सत्ता ही वैभवासाठी नव्हे तर जनसेवेसाठी असते हे आपल्या कार्यातून दाखवून दिले. आजच्या पिढीने अहिल्यादेवींच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण भारतासाठी प्रेरणादायी आहे. याप्रसंगी खासदार रामराव वडकुते, दीपक बोऱ्हाडे, राबदाडेमामा, ओमप्रकाश चितळकर, सभापती रंगनाथ येवले, नगराध्यक्ष प्रियंका राक्षे, प्रवीण सातोणकर प्रकाश चव्हाण सावता काळे, गणेश पवार, डॉक्टर इंगळे, भास्कर बेंगाळ, प्रसादराव गडदे नामदेव गोरे, सचिन बोंबले, हनुमान दवंडे, दत्ता कोल्हे, उद्धव शेंडगे रमेश आढाव उत्सव समितीच्या गीता इंगळे, सविता गोरे, अश्विनी कोल्हे, छाया गोरे, कुशीवृता गाते, संगीता आढाव, सुमन सागुते यांच्यासह हजारो महिलांची उपस्थिती होती.

### शेळीपालन कुक्कुटपालन...

तुपे, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, (एमसीईडी) जालना द्वारा-मराठा पार्क बिल्डिंग, विशाल कॉर्नर, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) चौफुली, जालना. फोन.नं.०२४८२ -२२०५९२ येथे संपर्क करावा. असे आवाहन विभागीय अधिकारी, एस के थोटे, अएमसीईडी छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जागतिक सायकल...

झेंडा दाखवुन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून सुरुवात करुन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही रॅली सिव्हिल क्लब (आझाद मैदान) येथे यशस्वीरित्या संपन्न झाली.

याच अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आरोग्य जनजागृतीसाठी रक्त तपासणी ( -) शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये अधिकारी, कर्मचारी तसेच उपस्थित नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या. निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला आरोग्य तपासणी शिबिरामुळे अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले होते.

सदर सायकल रॅलीचे वाहतूक नियोजन व सहभागींच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाने अत्यंत मोलाचे सहकार्य केले. रॅली दरम्यान वाहतुकीचे प्रभावी नियमन, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि सुरक्षेची योग्य काळजी घेऊन पोलीस विभागाने कार्यक्रमाच्या यशस्वितेत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी सर्व प्रशासकीय विभाग, विविध सायकलींग ग्रुप्स, इंडीयन मेडीकल असोसिएशन, व्यावसायिक, उद्योजक व उपस्थित नागरिकांचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन देवेंद्र बारगजे यांनी केले.

### पीएम श्री जिल्हा...

भगवानराव मोरे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, ''यशासाठी आत्मविश्वास आणि सातत्य आवश्यक आहे. अपयश आले तरी खचून न जाता नव्या जोमाने प्रयत्न करावेत.'' दया काटे यांनी विद्यार्थ्यांना संस्कार, प्रामाणिकपणा आणि शिस्तीचे धडे दिले. रमाकांत बेरीदे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात स्वतः ला सक्षम बनवण्याचे आवाहन केले. पालकांच्या वतीने विठ्ठल मामा कुलकर्णी यांनी शाळेने घेतलेल्या मेहनती बद्दल शिक्षकांचे व व्यवस्थापन समितीचे विशेष आभार मानले.

कार्यक्रमामध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये उत्कृष्ट यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. प्रशालेच्या अजय पद्माकर गोरे याने ९६.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रद्युम्न अक्रूर गोरे याने ९४.८० टक्के गुणांसह द्वितीय तर वैष्णवी तुकाराम अंभुरे हिने ९३.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.

तसेच साक्षी परमेश्वर भोसले ९२.२०, पुष्पा नानासाहेब बिल्हारे ९०.८०, पार्थ अंकुश कोल्हे ८९.६०, अर्जुन परमेश्वर काकडे ८९.६०, अमृता दत्ता घोरमाडे ८९.४०, सचिन प्रकाश वाघमारे ८८.२०, शिवराज नामदेव जोगडे ८६.६०, अंगद नागेश जाधव ८६.४०, आर्या विठ्ठल कुलकर्णी ८५.२०, अनुज प्रकाश टिपरसे ८४.४०, आरुष संतोष घोडके ८४.४०, आकांक्षा अनिल ढेकळे ८३.००, यशराज राजाराम जाधव ८२.८०, भक्ती प्रकाशराव देशपांडे ८२.४०, स्वराज सुदाम शिंदे ८२.००, राजनंदिनी हनुमान काळे ८१.००, प्रतीक्षा दिनेश आढे ७९.८०, आरती दिगंबर मोगरे ७९.००, विठ्ठल कैलास धुमाळ ७८.४०, सागर जगदीश वाळके ७८.४०, राधिका अरुणराव खरात ७७.८०, दीपक दत्ता राऊत ७७.८०, क्रांती शिवाजी मुळे ७७.०० आणि विद्या गजानन भांडवलकर ७६.२० टक्के गुण मिळवत प्रशालेचे नाव उज्वल केले.

कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षकवृंद आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होत असताना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून येत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, कैलास गाडगे.आणि श्रीमती तरोटे मॅडम यांनी प्रभावीपणे केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाची माहिती देताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या मेहनतीचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

समारोप प्रसंगी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. हा सत्कार समारंभ विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यात आणखी मोठे यश संपादन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले.

### ऑनलाइन जुगार...

मोठ्या संख्येने यात सहभागी होत आहेत. न्यायालयाने अखेरीस स्टेट ऑफ तामिळनाडू आणि इतर विरुद्ध जंगली गेम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि इतर (सिव्हिल अपील क्र. ६१२४-६१३१ ऑफ २०२३) या प्रकरणात हा निर्णय दिला.

### अ ब क ड उपवर्गीकरणाच्या...

स्मारक ते रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोर्चाचे रूपांतर सभेत होऊन अ ब क ड उपवर्गीकरणाचे फायदे किंवा नुकसान या संदर्भात अनेकांनी आपले मत मांडले समयोचित मार्गदर्शन संध्या विकास प्रधान,नगरसेवक राजेश खंदारे,धुराजी कांबळे, सभापती दत्ताभाऊ बनसोडे, वाघमारे, सभापती बाळासाहेब अंभीरे, रावसाहेब खरात यांनी केले तर प्रास्ताविक ॲड अनिल मोरे आणि संचालन उपनगराध्यक्ष अरूण वाघमारे यांनी केले या सह समाज बांधवांच्या वतीने चे अ ब क ड उपवर्गीकरणाची सर्व जाती आपणास नम्र विनंती करते की, मंठा शहरात तालुक्यातील सर्व अनुसूचित जाती यांच्या विरोधाचा आपने विचार करावा नसता संपूर्ण महाराष्ट्रभर भिमसैनिक तीव्र आंदोलन करतील याची नोंद राज्य सरकारने घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे

निवेदनतील प्रमुख मागण्या

१) एससी आरक्ष उपवर्गीकरण (अ.ब,क,ड) रद्द झालेच पाहिजे.
२)पदोन्नतील आरक्षण लागू झाले पाहिजे.
३)शासकिय नोकरीतील अनुशेष तात्काळ भरावा.
४) जातीनिहाय जनगणना करावी.
५) न्यायमूर्ती आनंत बदर समिती अहवाल सार्वजनिक करावा.
६) राखीव प्रवर्गातील उमेदवाराला गुणवत्तेच्या आधारावर खुल्या प्रवर्गातील न्यायीक प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे

या प्रमुख मागण्या सह तहसील कार्यालय प्रतिनिधी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनावर बाळासाहेब अंभीरे, ॲड अनिल मोरे, दत्ता बनसोडे, महादेव वाघमारे, गौतम सदावर्ते, अंबादास घायाळ, दादाराव हिवाळे,शरद मोरे, राजाराम चव्हाण, सुरेश वाव्हळे, आसाराम चोरमारे, रवि सदावर्ते, भीमराव वाघ, परमेश्वर मानकर, समाधान शिंदे,विजेश वाघमारे,रोहण वाघमारे, एकनाथ मानकर, गौतम खरात, सिध्दार्थ इंगळे, विठ्ठल सोनपसारे, परमेश्वर प्रधान, परमेश्वर आवारे, विशाल प्रधान, वसंत मोरे यांच्या स्वाक्षऱ्या होत्या.

# वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक साठी शिक्षक यांचे निवेदन



**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील शिक्षकांची वैद्यकीय प्रतीपूर्ती देयके बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहेत, जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे देयके एक महिना अगोदर शिक्षक बांधवांना मिळालेली आहेत ,परंतु जाफ्राबाद तालुक्यातील शिक्षक बांधव बजेट असून सुद्धा यापासून वंचित आहेत तरी या संदर्भात माननीय सहाय्यक गटविकास अधिकारी श्री देविदास मगर साहेब यांना निवेदन देण्यात आले या प्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भालके, तालुका नेते दीपक चव्हाण, पतसंस्थेचे माजी चेअरमन श्री बळीराम उबरहंडे, शिक्षकभारती संघटनेचे तालुकाध्यक्ष विजय वैद्य ,नेते श्री रिजवान शेख ,संचालक श्री संजय लोखंडे, सरचिटणीस श्री सतीश राऊत,संपर्क प्रमुख श्री अनंथा जंजाळ सह महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समन्वय समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# धर्मांतरास नकार दिल्याने ‘विप्रो’ कंपनीतील हिंदू महिला कर्मचाऱ्याला नोकरीवरून काढले; हिंदु जनजागृती समितीची कारवाईची मागणी !

**पुणे - प्रतिनिधी**

नाशिक येथील ‘टीसीएस’ कंपनीतील धक्कादायक प्रकार, त्यानंतर नुकतेच मुंबईतील ‘एसबीआय’ बँकेतील प्रकरण ताजं असतांनाच आता पुण्यातील हिंजवडी येथील ‘विप्रो टेक्नॉलॉजीज लिमिटेड’ या नामांकित कंपनीत ‘कॉर्पोरेट जिहाद’ आणि धार्मिक छळाचे अत्यंत गंभीर अन् संतापजनक प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षकांकडे तक्रार देण्यात आली आहे. या प्रकरणातील पीडीत हिंदु महिलेने पत्रकार परिषदेत प्रत्यक्ष उपस्थित राहून या प्रकरणाला वाचा फोडली.




‘कंपनीत कार्यरत असतांना माझ्यावर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी आणि एका मुस्लिम व्यक्तीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी पद्धतशीरपणे प्रचंड मानसिक दबाव निर्माण केला. या धर्मविरोधी आणि अनैतिक प्रकाराला मी ठामपणे नकार देत कंपनी प्रशासनाकडे तक्रार केली; मात्र कंपनी प्रशासनाने आरोपीवर कारवाई करण्याऐवजी मलाच नोकरीवरून काढून टाकले’, असे या प्रकरणातील पीडीत महिला कर्मचारीने सांगितले. या संतापजनक घटनेचा हिंदु जनजागृती समिती जाहीर निषेध करते. तसेच या प्रकरणी हिंदु जनजागृती समिती आणि पीडित महिला आम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे याप्रकरणी तातडीने लक्ष घालून या प्रकरणाचा उच्चस्तरीय तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करत आहोत, असे हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्याचे संघटक श्री. सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

पुणे येथील ‘श्रमिक पत्रकार भवन’ येथे पार पडलेल्या या पत्रकार परिषदेला पीडित हिंदू महिला (माजी कर्मचारी, विप्रो कंपनी), श्री. पराग गोखले (पुणे जिल्हा समन्वयक, हिंदु जनजागृती समिती), अधिवक्ता श्री. विवेक भोसले (राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती, पुणे), अधिवक्ता गोपाळ तेलंग आणि कु. क्रांती पेटकर (रणरागिणी शाखा) प्रामुख्याने उपस्थित होते.

या प्रकारामुळे कॉर्पोरेट क्षेत्रातील हिंदू महिलांच्या सुरक्षेचा आणि कंपन्यांच्या अंतर्गत व्यवस्थापनाच्या पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पीडित हिंदू महिलेने सांगितले की, ती विप्रो कंपनीत प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावत होती; मात्र काही काळापूर्वी तिच्याच टीममधील शाहिना रफिक नावाच्या एका महिला सहकाऱ्याने तिच्या (पीडितेच्या) वैयक्तिक आयुष्यात जाणीवपूर्वक अवाजवी हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली. शाहिनाने पीडितेला तिच्या ओळखीच्या ‘शेख’ नावाच्या मुसलमान व्यक्तीशी शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा, तसेच स्वतःचा मूळ हिंदू धर्म सोडून इस्लाम धर्म स्वीकारण्याचा खूप आग्रह धरला. ‘जर तू इस्लाम स्वीकारून मुस्लिम व्यक्तीसोबत राहिलीस, तर तुला दुबईत ऐषोआरामात आणि शांततेत जीवन जगता येईल’, अशी प्रलोभने आणि आमिषेही तिला सातत्याने दाखवण्यात येत होती. या सततच्या धार्मिक आणि मानसिक छळाला कंटाळून पीडितेने शाहिनाशी बोलणे पूर्णपणे बंद केले आणि केवळ कार्यालयीन कामापुरता मर्यादित संपर्क ठेवला.

पीडितेच्या म्हणण्यानुसार या वाढत्या त्रासाची आणि छळाची रीतसर तक्रार तिने कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली होती; परंतु विप्रो प्रशासनाने आरोपी शाहिना रफिक हिच्यावर कोणतीही दंडात्मक किंवा प्रतिबंधात्मक कारवाई केली नाही. उलटपक्षी, जेव्हा पीडितेने शाहिनाच्या वैयक्तिक फोन कॉल्सना प्रतिसाद देणे पूर्णपणे थांबवले, तेव्हा शाहिनाने सूडबुद्धीने पीडितेचे संभाषण छुप्या पद्धतीने रेकॉर्ड केले आणि तथ्य वाकवून पीडितेविरुद्धच कंपनीच्या ओंबड्स कमिटीकडे खोटी तक्रार दाखल केली. या संपूर्ण प्रकरणातील वरिष्ठ अधिकारी वसीम () यानेही शाहिनाला उघडपणे पाठीशी घालत तिच्यावर कारवाई करण्यास साफ नकार दिला. तसेच, विप्रोच्या एचआर व व्यवस्थापन समितीचे सदस्य झीशान अहमद आणि अन्य सदस्यांनी पीडितेची बाजू, तिची पूर्वतक्रार आणि पुरावे पूर्णपणे फेटाळून लावत एकतर्फी कारवाई केली.

या अन्यायाचा कळस ऑगस्ट २०२५ च्या अखेरीस गाठला गेला. एचआर प्रतिनिधी प्रशांत जी.आर. याने पीडितेला एका ‘मायक्रोसॉफ्ट टीम्स’ मीटिंगसाठी बोलावले. त्या मीटिंगदरम्यान टेक्नीकल ट्रीक्स वापरून पीडितेच्या लॅपटॉपचा स्क्रीन कंट्रोल स्वतःकडे घेतला आणि तिला कोणतीही पूर्वकल्पना न देता, तिच्या संमतीविना बळजबरीने तिच्याच सिस्टीमवरून राजीनामा सादर करण्यास भाग पाडले. कोणत्याही पूर्वसूचनेविना, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना हरताळ फासून आणि चौकशीअंती स्वतःचे म्हणणे मांडण्याची कायदेशीर संधी न देता अशाप्रकारे बळजबरीने राजीनामा घेणे, हे भारतीय श्रम व कामगार कायद्यांचे थेट उल्लंघन आहे, असे अधिवक्ता भोसले यांनी या वेळी सांगितले.

**न्यायासाठी ५० लाखांच्या भरपाईसह विप्रो प्रशासनाला कायदेशीर नोटीस!**

या संस्थात्मक अन्यायाविरुद्ध आणि छळाविरुद्ध पीडित महिलेने आपल्या वकिलांमार्फत विप्रो प्रशासनाला कायदेशीर नोटीस धाडली आहे. ‘दबावाखाली आणि बळजबरीने लिहून घेतलेला राजीनामा हा कायद्याच्या दृष्टीने अवैध असून तो त्वरित रद्द करण्यात यावा, तसेच पीडितेला पूर्ण वेतनासह आणि सेवासातत्यासह पुन्हा सन्मानाने नोकरीवर रुजू करून घेण्यात यावे,’ अशी मुख्य मागणी या नोटीसमध्ये करण्यात आली आहे. याशिवाय, पीडितेला झालेल्या अतोनात मानसिक त्रासापोटी, सामाजिक प्रतिष्ठेच्या नुकसानीपोटी ५० लाख रुपयांची आर्थिक नुकसान भरपाई द्यावी, कंपनीने अधिकृत लेखी माफी मागावी आणि मुख्य संशयित शाहिनासह तिला पाठीशी घालणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असेही त्यात ठणकावून सांगण्यात आले आहे. येत्या १५ दिवसांत कंपनीने यावर योग्य पावले न उचलल्यास दिवाणी, फौजदारी आणि कामगार न्यायालयात विप्रोविरुद्ध थेट खटला दाखल करण्याचा इशारा पीडित हिंदू महिलेने दिला आहे.

**पुण्याच्या आयटी क्षेत्रातील हिंदूविरोधी अजेंडा खपवून घेणार नाही!**

या वेळी हिंदु जनजागृती समितीचे श्री. सुनील घनवट म्हणाले की, या संपूर्ण प्रकरणात पीडित हिंदू महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी आता हिंदु जनजागृती समिती मैदानात उतरली आहे. नाशिकमधील टीसीएस कंपनीच्या प्रकारानंतर पुण्याच्या आयटी कंपनीत उघडकीस आलेली ही घटना म्हणजे सुनियोजित ‘कॉर्पोरेट जिहाद’चाच भाग आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उच्च पदांवर बसून हिंदू महिलांच्या धार्मिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा हा प्रकार अत्यंत चिंताजनक आहे. हा केवळ एकच प्रकार नसून अधिक प्रकरणे घडल्याची शक्यता नाकारता येत नाही. पुण्याच्या आयटी क्षेत्रातील हा हिंदूविरोधी अजेंडा आणि छळ कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. अन्य मोठ्या कंपन्यांमध्ये असे प्रकार घडत आहेत का, याची शासनाने व्यापक चौकशी केली पाहिजे. कोणत्याही हिंदू महिलेवर अशा प्रकारचा अन्याय, धार्मिक छळ अथवा धर्मांतरासाठी दबाव येत असेल, तर त्यांनी न घाबरता हिंदु जनजागृती समितीच्या ७७३८२३३३३३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

---

## मुंबईच्या अंधेरी येथे वेस्टर्न इंडिया फिल्म प्रोड्युसर्स असोसिएशन व लायन्स क्लब ऑफ मिलेनियमच्या वतीने ११ वा मोफत मेगा आय कॅम्प संपन्न

**मुंबई - प्रतिनिधी**

वेस्टर्न इंडिया फिल्म अँड टीव्ही प्रोड्युसर्स असोसिएशन आणि लायन्स क्लब ऑफ मिलेनियम यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ३१ मे २०२६ रोजी माहेश्वरी हॉल, अंधेरी पश्चिम, मुंबई येथे ११ वा मोफत मेगा नेत्र तपासणी, मोफत चष्मे व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. गेली ११ वर्षे सातत्याने या शिबिराचे आयोजन करण्यात येते. आजवर २०० पेक्षा अधिक गरजू लोकांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत.




फिल्म इंडस्ट्री आणि सर्वसामान्य जनता या शिबिराचा लाभ घेतात. यंदा सुमारे ५०० लोकांनी आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेण्याची संधी घेतली.

संस्थेचे अध्यक्ष श्री. संग्राम शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली, प्रोजेक्ट चेअरमन श्री. पवन खेतान, विप्फाचे सरचिटणीस श्री. दिनेश आशिवाल, कार्यक्रम प्रमुख श्री. धर्मेंद्र मेहरा, तसेच लायन्स क्लब ऑफ मिलेनियमचे अध्यक्ष श्री. दिलीप सांगानेरिया, सरचिटणीस श्री. आनंद अग्रवाल आणि खजिनदार श्री. प्रकाश झुनझुनवाला यांच्या पुढाकाराने हे शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. या उदात्त कार्याला प्रमुख चित्रपट व्यक्तिमत्त्वे एफडब्ल्यूआयसीचे अध्यक्ष श्री. बी. एन. तिवारी, इम्पाचे अध्यक्ष श्री. अभय सिन्हा, इम्पाच्या उपाध्यक्ष सौ. सुषमा शिरोमणी, फिल्म मेकर्स कम्बाईनचे महासचिव श्री. निशांत उज्ज्वल, फिल्म डायरेक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अशोक पंडित, सिने स्टील, टीव्ही आणि मोशन फोटोग्राफर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष रमाकांत मुंडे आणि महासचिव अतुल राजकुले यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. आर्ट डायरेक्टर्स असोसिएशनचे महासचिव श्री. रंगाराव चौघुले, तसेच प्रसिद्ध कलाकार श्री. मुकेश ऋषी, श्री. हेमंत बिर्जे, अभिनेत्री सौ. साहिला चड्ढा आणि सुश्री तानी देओल यांची उपस्थिती लाभली. वेस्टर्न इंडिया फिल्म प्रोड्युसर्स असोसिएशनच्या सौ. अंजना शर्मा, कु. चांदनी गुप्ता, डॉ. प्रल्हाद खंडारे, सौ. प्रिया राठोड, डॉ. युवामित्र द्विवेदी, श्री. अरविंद कुमार वाघेला, सौ. चंदा पटेल यांच्यासह सर्व कर्मचारी वर्गाने शिबिराच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**

---

## ३१ मे या दिवशी तीन मुख्याध्यापक सेवानिवृत्त, जाफराबादेत मुख्याध्यापकांचा सत्कार; रिक्त जागा भरण्याची पालकांची मागणी

**दत्ता देशमुख**



जाफराबाद तालुक्यातील तीन मुख्याध्यापक ३१ मे रोजी एकाच दिवशी सेवानिवृत्त झाले आहेत. यात जाफराबाद येथील जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक शिवहरी ढाकणे, बुटखेडा येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अंबादास तळेकर व बोरगाव फदाट येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक भरत देशमुख यांचा समावेश आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी शिक्षक व ग्रामस्थांच्या वतीने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ‘‘जाफराबाद तालुक्यातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी दिलेले प्रेम आणि सहकार्य आपण आयुष्यात कधीही विसरू शकणार नाही,‘‘ अशा भावना सेवानिवृत्त मुख्याध्यापकांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केल्या. दरम्यान, तालुक्यात दरमहा अनेक शिक्षक व मुख्याध्यापक सेवानिवृत्त होत असल्याने अनेक जागा रिक्त होत आहेत. या रिक्त जागा तातडीने न भरल्यास विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. हे नुकसान टाळण्यासाठी शिक्षण विभागाने रिक्त जागा त्वरित भराव्यात, अशी मागणी पालकांमधून केली जात आहे.

---

## जैन कलार समाजतर्फे १४८ गुणवंतांचा भव्य सत्कार




**जालना- प्रतिनिधी**

दिनांक ३१ मे २०२६ ला १० वी, १२वी, सीबीएसई, आयसीएसई, जेईई मेन्स, एमबीबीएस, चार्टर्ड अकाउंटंट, पीएच.डी.,आर्किटेक्चर अशा विविध क्षेत्रातील यशस्वी विविध शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या १४८ गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा भव्य सत्कार जैन कलार समाज भवन, रेशिमबाग, नागपूर येथे जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ ( केंद्रित व जिल्हा समिती) यांच्या वतीने करण्यात आला. त्याचप्रमाणे भारताच्या वायुदलाचे शूर वैमानिक, शहीद फ्लाईट लेफ्टनंट पूर्वेश दुरुगकर या वीरपुत्रांच्या स्मृतीना अभिवादन करून त्यांच्या कुटुंबीयांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार.यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव व विद्यार्थ्यांचे पालक वर्ग प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मोहनजी मते व आमदार संजयजी भेंडे यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.यावेळी प्रामुख्याने जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री चंद्रशेखरजी आदमने,माजी अध्यक्ष अनिल अहिरकर, उपाध्यक्ष शशीकांत समर्थ, सचिव कार्तीक शेंडे, जिल्हा समिती अध्यक्ष श्रीकांत शिवनकर, पत्रकार रमेश लांजेवार,छाया दुरूगकर, सुरेखा अहिरकर,विद्या समर्थ,सचिन दहिकर, मोरेश्वर मानापुरे,डॉ. विजय आदमने, अशोक रणदिवे, विनोद खेडीकर, मिलिंद मानापुरे, रमेश लांजेवार, सुधन लांजेवार,दिलीप पलांदूरकर, दीपक आदमने, कृष्णा खानोरकर,अतुल दुरुगकर, किरण गोसेवाडे, प्रकाश मासूरकर, अरुण खानोरकर, राजेश समर्थ, राजेश वारजुरकर इत्यादीसह अनेक पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल समर्थ यांनी केले व आभारप्रदर्शन शैलेश दहीकर यांनी केले.

**रमेश लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०६६९, नागपूर.**

---

## विनोद सम्राट ; पद्मश्री अशोक सराफ

मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७९ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७९ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली.

आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना मागीलवर्षी पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला होता. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या होत्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७९ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा अशोक मामा!!!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आपल्याला सेवा, त्याग, न्याय, प्रामाणिकपणा आणि लोककल्याणाची प्रेरणा देते - आमदार लोणीकर

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त परतूर शहरात जल्लोषात जयंतीउत्सव सोहळा संपन्न

**परतूर - प्रतिनिधी**

अत्यंत साध्या कुटुंबात जन्मलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्ता, धैर्य आणि दूरदृष्टीच्या बळावर संपूर्ण देशाच्या इतिहासात अजरामर स्थान मिळवले. पती खंडेराव होळकर आणि सासरे मल्हारराव होळकर यांच्या निधनानंतर त्यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली. त्या काळात महिलांना राजकारण आणि प्रशासनात संधी मिळत नव्हती. मात्र अहिल्यादेवींनी आपल्या कर्तृत्वाने हे सिद्ध करून दाखवले की, नेतृत्व हे पुरुष किंवा स्त्री यावर अवलंबून नसून कर्तृत्वावर अवलंबून असते. असे प्रतिपादन भाजपा नेते, माजी मंत्री परतूर मंठा विधानसभा मतदार संघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त परतूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहात आयोजित जयंती उत्सव सोहळ्याचे






उदघाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले या वेळी मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खासदार रामराव वडकुते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून दिपक बोऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे न्यायप्रियता. त्यांच्या दरबारात कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होत नव्हता. गरीब, शेतकरी, व्यापारी आणि सामान्य जनतेच्या समस्या त्या स्वतः ऐकून घेत असत. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या त्या खऱ्या अर्थाने लोकमाता होत्या. अहिल्यादेवींनी देशभरातील अनेक मंदिरे, घाट, विहिरी, तलाव, धर्मशाळा आणि रस्त्यांचे बांधकाम केले. काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर, त्र्यंबकेश्वर मंदिर, घृष्णेश्वर मंदिर यांसारख्या अनेक तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. भारतातील असंख्य धार्मिक स्थळांच्या पुनर्बांधणीत त्यांचे कार्य आजही स्मरणात आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी पुढे आपल्या भाषणात शेती, व्यापार आणि उद्योगांना प्रोत्साहन देऊन त्यांनी राज्य आर्थिकदृष्ट्या सक्षम केले. शेतकऱ्यांना मदत, व्यापाऱ्यांना संरक्षण आणि जनतेला सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे हे त्यांच्या शासनाचे (पान २ वर)

घनसावंगी आणि अंबड येथे पशुसंवर्धनावर आधारित

# शेळीपालन कुक्कुटपालन दुग्धव्यवसाय गाय, म्हैसपालन प्रशिक्षणाचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, एमसीईडी जालना द्वारे घनसावंगी आणि अंबड येथे आणि अंबड येथे ५ दिवसीय कालावधीचे '' पशुसंवर्धनावर आधारित शेळीपालन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) जालना जिल्हा द्वारे घनसावंगी कुक्कुटपालन दुग्धव्यवसाय गाय / म्हैसपालन'' प्रशिक्षण कार्यक्रम'' दि.१६ जुन ते १९ जुन२०२६ या कालवधीमध्ये आयोजन करण्यात आले आहे. सुशिक्षित बेरोजागार युवक-युवती व महिलांनी उद्योग व्यवसाय क्षेत्राकडे वळून स्वतः चा स्वयंरोजगार निर्माण करावा असा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजना मागचा मुख्य उद्देश आहे. सदर प्रशिक्षणामधून प्रशिक्षणार्थींना स्वयंरोजगाराबाबत उपलब्ध बंदीस्त शेळीपालनः- शेळीपालनाची सद्य स्थिती शेळ्यांच्या विविध जाती निवड आदर्श गोठा शेळ्याचे प्रमुख आजार व लक्षणे प्रतिबंधक उपाय व उपचार शेळ्याचे संतुलित आहार, गाभण शेळ्याचे व करड्याचे संगोपन इ. सखोल मार्गदर्शन या शिवाय उद्योजकता प्रशिक्षण :- ज्यामध्ये उद्योजकीय प्रेरणा व गुणसंपदा, कौशल्य विकास व स्वयं मुल्यांकन (मी कोण आहे) उद्योग उभारणी विवध टप्पे, आपल्या कामासाठी कुठे संपर्क करावा, उद्योग व्यवसायाची निवड, उद्योग संधी, उद्योग व्यवस्थापन, बाजार पेठ व्यवस्थापन, मार्केटिंग व संभाषण कौशल्य, विविध कार्यालय व महामंडळांच्या कर्ज विषयक माहिती, राष्ट्रीय कृत बँका नाबार्ड, यांचे कार्य व योजनांविषयी माहिती लघु उद्योग नोंदणी कर्ज व सादरीकरण व प्रक्रिया, उद्योग संदर्भात कायदे, शासकीय कर्ज योजनांची माहिती व सवलती इ.बाबत तज्ञ व अधिकारी वर्गामार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे. सदर कार्यक्रमासाठी प्रशिक्षणार्थी हा किमान ७ वी पास व १८ ते ५० वयोगटातील असावा तसेच स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरु करण्याची प्रबळ इच्छा असावी. तरी इच्छुकांनी प्रवेश अर्ज व अधिक माहितीसाठी दि.१५ जुन २०२६ पूर्वी कैलास भाबट, कार्यक्रम समन्वयक, मो. ७४९८३९८४८३ , ९६८९६७८३९४२ जालना किंवा प्रकल्प अधिकारी विनोद (पान २ वर)

# जागतिक सायकल दिन निमित्त भव्य सायकल रॅली संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

जागतिक सायकल दिनानिमित्त जिल्हा प्रशासन, जालना यांच्या वतीने आज आयोजित करण्यात आलेल्या भव्य सायकल रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, आर. परिविक्षाधीन रंगमंजू भा.प्र.से.,अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, सर्व उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, मनिषा दांडगे, सुकेशीनी पगारे व तहसिलदार छाया पवार, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पोलीस विभाग, एसआरपीएफ, माय भारत ( ) उपक्रम, इंडियन मेडिकल असोसिएशन (), विविध सायकलिंग ग्रुप्स, व्यावसायिक, उद्योजक तसेच नागरिक मोठ्या संख्येने या सायकल रॅलीत सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सायकलचे महत्व, पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने महत्व याअनुषंगाने उपस्थितांस मार्गदर्शन केले. सायकलचा दैनंदिन जीवनात अधिकाधिक वापर करून पर्यावरणपूरक व निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी जालना जिल्ह्यातील कैलास झोळगे यांनी आयर्नमॅन ही जागतिक स्तरावरील व्हीएतनाम येथे आयोजित अत्यंत कठीण व प्रतिष्ठेची क्रीडा स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल श्रीमती मित्तल यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. ''सायकल चालवा, पर्यावरण वाचवा आणि आरोग्य वाढवा'' हा संदेश देण्यासाठी आज आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीला सर्व वयोगटातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सायकल रॅलीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी हिरवा (पान २ वर)

# पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

**परतूर - प्रतिनिधी**

पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूरच्या वतीने दि. २ जून २०२६ रोजी श्री श्री रविशंकर ध्यान केंद्र, परतूर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी भारतीय संरक्षण दलामध्ये निवड झालेल्या प्रशालेच्या माजी विद्यार्थ्याचा तसेच इयत्ता दहावीमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या ३२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूरचे मुख्याध्यापक, गणेश राठोड होते. प्रमुख उपस्थितीमध्ये,भगवानराव मोरे तात्या, दया काटे महाराज तसेच रमाकांत बेरीदे यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व, कठोर परिश्रम, सातत्य आणि शिस्त यांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व आद्य शिक्षिका सावित्रीमाई फुले पूजनाने करण्यात आली. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, फाईल फोल्डर व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. प्रशालेचा विद्यार्थी आशिष उद्धवराव भिसे याची भारतीय संरक्षण दलामध्ये निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित विद्यार्थ्यांसाठी त्याचा प्रवास प्रेरणादायी ठरला. यावेळी अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक, गणेश राठोड म्हणाले की, ''ग्रामीण भागातील विद्यार्थी जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मोठे यश संपादन करू शकतात. आज आपल्या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश ही संपूर्ण परतूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि इतर आकर्षणांपासून दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.' (पान २ वर)

# ऑनलाइन जुगार सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी गंभीर धोका: सर्वोच्च न्यायालय

**जालना - प्रतिनिधी**

ऑनलाइन बेटिंग आणि जुगाराच्या वाढत्या प्रसारावर गंभीर चिंता व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाने याला सार्वजनिक सुव्यवस्था, शांतता आणि आरोग्यासाठी मोठा धोका ठरवले आहे. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने नमूद केले की, तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे प्रत्येक मोबाईल फोन आभासी जुगार अड्डा बनला आहे, ज्यामुळे समाजात सट्टेबाजी आणि जुगार अधिक सामान्य आणि सहज उपलब्ध झाला आहे. न्यायालयाने आपल्या महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले की, राज्यांना भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची मधील सार्वजनिक सुव्यवस्था या विषयांतर्गत ऑनलाइन बेटिंग आणि जुगार यांसारख्या क्रियाकलापांचे नियमन आणि प्रतिबंध करण्याचे अधिकार आहेत. या प्रकारच्या ऑनलाइन गेमिंगमुळे होणारे सामाजिक नुकसान, जसे की व्यसनाधीनता, आर्थिक नुकसान आणि आत्महत्या, यांचा थेट संबंध सार्वजनिक सुव्यवस्थेशी आहे, असे न्यायालयाने अधोरेखित केले. या निरीक्षणासह, न्यायालयाने तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यांनी ऑनलाइन सट्टेबाजी आणि जुगारावर बंदी घालणारे कायदे कायम ठेवले, जरी ते कौशल्याच्या खेळांवर आधारित असले तरीही. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, सार्वजनिक सुव्यवस्थेमध्ये केवळ हिंसाचार किंवा अव्यवस्थाच नाही, तर समाजातील शांतता, नागरिकांचे सुरक्षित आणि सुव्यवस्थित सामाजिक जीवन आणि समाजाच्या जीवनातील समतोल राखणे यांचाही समावेश होतो. ज्या गोष्टींमुळे सार्वजनिक आरोग्यास हानी पोहोचते, समाजात भीती किंवा गोंधळ निर्माण होतो, किंवा सामाजिक आणि आर्थिक अस्थिरता येते, त्या सर्व गोष्टी सार्वजनिक सुव्यवस्थेत अडथळा आणतात. ऑनलाइन गेमिंगमुळे होणारे आर्थिक नुकसान आणि व्यसनाधीनता आता वैयक्तिक घटना राहिलेल्या नाहीत, तर त्या समाजाच्या मोठ्या वर्गावर परिणाम करत आहेत.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत दूरगामी आणि समाजासाठी महत्त्वाचा आहे. ऑनलाइन जुगाराच्या विळख्यात अडकलेल्या तरुण पिढीला आणि कुटुंबांना वाचवण्यासाठी हा एक मजबूत कायदेशीर आधार आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक घरात पोहोचलेल्या या आभासी जुगारामुळे होणारे सामाजिक आणि आर्थिक नुकसान गंभीर आहे. या निकालामुळे राज्य सरकारांना आता या धोक्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर कायदे करण्याची स्पष्ट शक्ती मिळाली आहे, ज्याचा त्यांनी त्वरित वापर करायला हवा.''

तामिळनाडू सरकारने न्यायालयासमोर जागतिक आरोग्य संघटनेच्या () अहवालाचा संदर्भ दिला, ज्यामध्ये गेमिंग डिसऑर्डरला एक मानसिक आजार म्हणून मान्यता दिली आहे. या आजारामध्ये व्यक्ती हानिकारक परिणाम होत असूनही गेमिंगवर नियंत्रण ठेवू शकत नाही. न्यायालयाने हे मान्य केले की, ऑनलाइन गेमिंगमुळे होणारे व्यसन, नैराश्य आणि त्यातून होणाऱ्या आत्महत्या या एका मोठ्या सार्वजनिक आरोग्य समस्येकडे निर्देश करतात.

न्यायालयाने असेही नमूद केले की, पारंपरिक जुगार कायद्यांचा उद्देश जुगाराच्या अड्ड्यांना रोखणे हा होता, परंतु डिजिटल युगात हा उद्देश पूर्णपणे अयशस्वी ठरला आहे. स्मार्टफोन, इंटरनेट आणि डिजिटल पेमेंट सिस्टममुळे ऑनलाइन गेमिंगचा झपाट्याने विस्तार झाला आहे आणि आता ग्रामीण आणि कमी उत्पन्न गटातील लोकही (पान २ वर)

# अनुसुचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, बदनापूर येथे

## शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहायक आयुक्त, समाजकल्याण अधिनस्त असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, बदनापूर जि. जालना येथील इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना खालील प्रवर्गानुसार रिक्त जागा राखीव आहेत. प्रवर्ग एससी ८० टक्के, जागा ४६, प्रवर्ग एसटी १० टक्के जागा १६, प्रवर्ग व्हीजेएनटी ५ टक्के जागा २, प्रवर्ग एसबीसी २ टक्के जागा ५, प्रवर्ग पीएच ३ टक्के जागा ५, एकुण ७४ जागा इयत्ता ६ वी साठी ४० जागा व ७ वी ते १० वी वर्गामध्ये रिक्त असेल्या संवर्गानुसार रिकत जागेसाठी प्रवेश पात्र ६ वी ते १० मध्ये शिक्षण घेत असलेल्या सेमी इंग्रजी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्ग व दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. २० जुन २०२६ पर्यंत मुख्याध्यापक, अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, बदनापूर यांच्याकडे प्रवेश अर्ज भरुन द्यावेत, त्यांनतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. जालना जिल्ह्यातील वरील प्रवर्गातील इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन सहायक आयुक्त अनिता राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# पाणीपुरवठा व समाज सेवेमधील योगदान आजही जनता विसरलेली नाही, मानव सेवा मंडळातर्फे सर्जेराव शिंदे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**दत्ता देशमुख**

जालना जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता तथा माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव विठोबा शिंदे ३१ मे २०२६ रोजी प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने टेंभुर्णी येथील मानव सेवा मंडळातर्फे त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला.

सर्जेराव शिंदे यांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून जनसेवेचा वसा घेतला. तसेच कार्यकारी अभियंता पदावर काम करताना त्यांनी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात



**लोकाभिमुख कामाला प्राधान्य**

शिंदे साहेबांनी प्रशासकीय सेवेत असताना नेहमीच लोकाभिमुख कामाला प्राधान्य दिले. पाण्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्यांनी संवेदनशीलतेने काम केले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे सामाजिक कार्यातील मार्गदर्शन आम्हाला लाभेल. सर्जेराव शिंदे यांचे काम हे आजही जनता विसरलेली नाही आणि इथून पुढेही विसरणार नाही. सेवाभावी वृत्तीने काम करण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केलेली असल्यामुळे गावाला त्यांच्या मार्गदर्शनाची अत्यंत गरज आहे.

अनेक गावांना शुद्ध पाणीपुरवठा योजना आणि जलजीवन मिशनची प्रभावी अंमलबजावणी यांसारखी कामे मार्गी लागली.

सत्कार सोहळ्याला मानव सेवा मंडळाचे पदाधिकारी नसीम शेख, संजय निकम, सुनील अंभोरे, संजय राऊत, फैसल चाऊस, ज्ञानेश्वर उखर्डे, अलकेश सोमाणी, बालाजी मगर, डी. आर. मुनेमाणिक, गजानन डोमळे आदी उपस्थित होते.

शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी सर्वांचे आभार मानून पुढील काळातही सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याची ग्वाही दिली.

# अ. ब. क. ड. उपवर्गीकरणाच्या विरोधात मंठा येथे भव्य मोर्चा

## शिक्षण, नौकरी आणि सन्मान आरक्षणाने होईल उत्थान फलक मोर्चाचे आकर्षण

**मंठा - प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून अनुच्छेद ३४१ मध्ये संमुदायातील ५९ जातींना त्यांच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक प्रगतीसाठी व आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या समाजाला प्रवाहात आणण्यासाठी १३ टक्के आरक्षण ची तरतूद केली त्यांच्या बदलोत आज प्रवर्गातील जातीनी काही प्रमाणात शैक्षणिक बाबींमध्ये



आपला ठसा उमटून राष्ट्राच्या प्रगतीमध्ये आपले योगदान सिद्ध केले आहे. परंतु आज मीतिला महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत असलेल्या विद्यमान भारतीय जनता पक्षाचे सरकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देऊ केलेल्या प्रवर्गातील आरक्षणाला काही समाजविघातक शक्तीना पुढे करून अब क ड असे उपवर्गीकरण करू इच्छित आहे जे की संविधानाच्या अनुच्छेद ३४१ चे सरासर उलघन असून त्यामुळे प्रवर्गात फूट पाडून भविष्यात आरक्षणच बंद करण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहे. राज्य शासनाच्या या असंविधानिक निर्णयाला मंठा येथे विरोध करत मंठा तालुक्यातील भिमसैनिकांनी सक्त विरोध करत छत्रपती संभाजी महाराज चौक विडोळी फाटा मुख्य रस्ता मार्गे कृषी उत्पन्न बाजार समिती,बस स्थानक परिसर, डॉ बाबासाहेब आंबेडकर (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.